# उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी कार्यालय, मलकापुर

प्रशासकीय इमारत, मलकापुर ता. मलकापुर जि. बुलडाणा

दुरध्वनी क्र. 07267-222122 ई मेल sdomalkapur@rediffmail.com

क्रमांक : अ.का./भूसंपादन/कावि- 1840 /2018 दिनांक :- 15 नोव्हेंबर 2018

## - जाहीर नोटीस -

***

राज्य शासनाच्या सिंचन व इतर प्रकल्पासाठी खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याचे अनुषंगाने महसूल व वन विभाग, मंत्रालय शासन निर्णय दि. 12/05/2015 व दि. 30/09/2015 अन्वये मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आलेली आहेत. तसेच शासन परिपत्रक क्र. एलएक्युएन-01/2017अ-2अ दि. 25/01/2017 अन्वये खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याचे अनुषंगाने कार्यपध्दती विषद केलेली असुन त्याचे (2)(ब)(एक) अन्वये प्रस्तावाची जाहीर सुचना खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| प्रस्तावाचे नांव | भूसंपादन प्रकरण 09/2013-14 मौजे वाघोळा ता. मोताळा जि. बुलडाणा (रणथम पाझर तलाव) मधील 2.02 हे. आर. जमीन 7 भूधारक खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेणे. |
| भूसंपादन अधिकारी | उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी मलकापुर |
| यंत्रणा | जिल्हा जलसंधारण, जिल्हा मृद व जलसंधारण विभाग, बुलडाणा |
| यंत्रणा उपविभाग | उपविभागीय जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण उपविभाग मलकापुर |
| संपादनाचे प्रयोजन | रणथम पाझर तलाव |

मौजे वाघोळा ता. मोताळा जि. बुलडाणा येथील खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घ्यावयाच्या जमीनींचा गोषवारा

| अ.क्र. | भूधारकाचे नांव | गट क्र. | संपादीत क्षेत्र हे. आर. | वन झाडे, फळ झाडे, बांधकाम ईत्यादी |
|---|---|---|---|---|
| 1. | राजु प्रल्हाद वाघ | 166 | 0.11 | निरंक |
| 2. | ओमप्रकाश नारायण गुप्ता व इतर | 168 | 0.07 | निरंक |
| 3. | युवराज प्रल्हाद वाघ | 171/1 | 0.44 | निरंक |
| 4. | ज्ञानदेव रामकृष्ण डमाळे | 173/2 | 0.99 | विहीर |
| 5. | ज्ञानदेव रामकृष्ण डमाळे ताबा | 171/2 | 0.21 | निरंक |
| 6. | तुकाराम रामकृष्ण डमाळे | 173/1 | 0.06 | निरंक |
| 7. | लक्ष्मण खंडु डमाळे | 174 | 0.14 | निरंक |
| | एकुण | | 2.02 | |

करीता उपरोक्त नमुद जमीनी बाबत ह्या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येत आहे की,

1) उपरोक्त जमीन खाजगी वाटाघाटी व्दारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्यात येणारे असल्याने सदर जमीनीचे मालकी हक्का बाबत काही वाद असल्यास हिस्से वाटे इत्यादी बाबत वाद, न्यायालयीन खटला चालु असल्यास ह्या जाहीर प्रकटना पासुन 07 दिवसांचे आत उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी मलकापुर यांचे कार्यालयात शासकीय कामकाजाचे दिवसात दुपारी 2.00 वाजे पावेतो लेखी आक्षेप कागदोपत्री पुराव्यासह तीन प्रतीत सादर करावे.

2) उपरोक्त नमुद 01 नुसार विहीत कालावधीत आलेल्या आक्षेपांबाबत विचार करण्यात येईल. विहीत मुदती नंतर प्राप्त आक्षेपा बाबत विचार करण्यात येणार नाही.

3) सदर प्रस्तावा बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकारी हा संबंधीत भूसंपादन अधिकारी यांचा राहील.

4) उपरोक्त प्रस्तावाची फक्त संयुक्त मोजणी ह्या जाहीर प्रगटनापासुन 07 दिवसा पावेतो उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी मलकापुर यांचे कार्यालयीन वेळेत व दिवसा सकाळी 11.00 ते दुपारी 2.00 पावेतो पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

उपविभागीय अधिकारी,
तथा भूसंपादन अधिकारी मलकापुर.